***1.3.2 Number of courses that include experiential learning through project work/field work/internship during the year.***

***And***

***1.3.3 Number of students undertaking project work/field work/ internships***

| | |
|---|---|
| Year | 2020-2021 |
| Number | 02 |

**Total Number of projects undertaken and completed during 2020-2021 = 12**

## 1.3.3. Number of students undertaking project work/field work/ internships

| | |
|---|---|
| **Year** | **2020-2021** |
| **Number** | **177** |

**Name of the course in which the project work was undertaken :HOME ECONOMICS**

**Academic year: 2020-2021**

**Name of the Project: Project on Stages of Human Development**

**Number of students completing the project: 10**

## BRIEF REPORT

### Brief Report of on Completion of Project

### Academic Year- 2020-2021

| | | |
|---|---|---|
| Name of the Project Undertaken | Project on Stages of Human Development | |
| Academic Session | 2020-2021 | |
| Organizing Department/ Committee | Department of Home- Economics | |
| Total number of students Participated in the project | 10 | |
| Brief Report | The Project entitled Stages of Human Development was undertaken by the Department of Environment Science during the session 2020-2021 under the guidelines of the Internal Quality Assurance Cell of the institution. Total 10 students participated in the project activity and successfully completed the project. The completion certificates have been given to the students. All the students found it very interesting to learn through the experiential learning. They enjoyed the project work. | |
| Criterion No. I | Metric No:-1.3.2 | |
| Signature of Activity Co-ordinator | Signature and Stamp of IQAC Co-ordinator | Signature & Stamp of Principal |
| | Co-ordinator, IQAC Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur | Principal Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15 |

## List of students completing the project

**Project on Stages of Human Development**

Academic Session- 2020-2021

**List of students completing project-**

| Sr. NO. | Name of students | Program |
|---|---|---|
| 1 | HEMLATA KUSHOBA MESHRAM | B.A. |
| 2 | KALYANI NARESH LOKHANDE | B.A. |
| 3 | MAYURI MANOJ BAWARIYA | B.A. |
| 4 | PRIYA BHAURAO NEWARE | B.A. |
| 5 | PRACHI SHIVRAM CHAWALE | B.A. |
| 6 | SHIVANI LAXMAN WANKHEDE | B.A. |
| 7 | SWATI UMADATTA TIWARI | B.A. |
| 8 | SAMIKSHA SURESH KODAPE | B.A. |
| 9 | SHABNUM SHANKARRAO KOSARE | B.A. |
| 10 | TEJASWINI NITENDRAKUMAR SONWANE | B.A. |

Signatue of Project Co-ordinator

Co-Ordinator, IQAC
Yashoda Girls' Arts &
Commerce College, Nagpur

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

**Project Copy**

# Yashoda Girls'

## Arts & Commerce College

Sneh Nagar, Wardha Road, Nagpur 440015

**DEPARTMENT OF HOME ECONOMICS**

PROJECT REPORT

A PROJECT ON STAGES OF HUMAN DEVELOPMENT

**Session**

**2020-2021**

# Certificate

**'Yashoda Girls'**
**Arts & Commerce College**
**Sneh Nagar, Wardha Road, Nagpur 440015**

## CERTIFICATE

This is to certify that the project entitled

**A PROJECT ON STAGES OF HUMAN DEVELOPMENT**

Submitted by

1. Arti N. Kale 2. Archana S. Dhurve 3. Heena G. Bhalekar
4.Dipali M. Bawariya 5. Hemlata Meshram
6. Kalyani N. Lokhande 7. Mayuri M. Bawariya
8. Priya B. Neware 9. Prachi S. Chawbe
10. Shivani L. Wankhede 11. Swati V. Tiwari.
12. Samiksha S. Kodape 13. Shabnam S. Kosare
14. Tejaswini N. Sonwane.

The projects based on the syllabus of Home Economics entitled 'STAGES OF HUMAN DEVELOPMENT' for the session 2020-2021 has been completed and are approved

Head of the Department

Principal

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

Date: 05/02/2021

College Seal

SEAL

# CERTIFICATE

Name of the Department Home - economiks

This is to certify that this Project Record for the project entitled 'STAGES OF HUMAN DEVELOPMENT' under Home Economics subject contains the bonafide Practical/project Works completed by Kumari Prachi Shivaram Chawale

During the Academic year 2020-21

Date

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

Signature of the Teacher

Signature of the Principal

Seal of the College

SEAL

# Certificate

# Certificate

*Certified that the Practicals written in this practical notebook is satisfactorily performed by*

*Master / Miss* Prachi S. Chawale

*Class* III^rd^ year *Sec* V^th^ sem *Roll. No.* ________

*During the Academic session* 2020 – 2021

05-02-2021

*Date*

*Teacher Incharge*

*Seal of School / College*

SEAL

*Sig. of H.O.D. / Principal*

# Project Copy

www.youvaworld.com

Date : Page :

Topic :

## बालविकास


| क्र | विषय | पेज नंबर |
|---|---|---|
| 1) | प्रस्तावना | 1 |
| 2) | बालविकासाची व्याख्या | 1 |
| 3) | बालविकासाचे महत्व | 2 |
| 4) | बालविकासाची व्याप्ती | 3 |
| 5) | बालविकासाचे अध्ययन | 4 |
| 6) | बालविकासाची वाढ व विकास | 8 |


SEAL

**Project Copy**

Date: Page: 1
Topic:

# बालविकास

## प्रस्तावना :-

बालविकास या शब्दाची फोड केली असता बाल व विकास असे दोन शब्द तयार होतात. बाल म्हणजे बालक व बालविकास म्हणजे "बालकांचा विकास" असे म्हणता येईल.

बालविकासाचा अभ्यास प्राचीन काळापासून केला जातो परंतु तेव्हा त्याला शास्त्रीय आधार नव्हता. आधुनिक काळात बालविकासाचा अभ्यास शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जातो. बालविकासाचे अध्ययन, हा अनेक विषयांचा एक भाग आहे. उदा - गृहअर्थशास्त्र, गृहविज्ञान, मानववंशशास्त्र, जीवशास्त्र, वैद्यकशास्त्र, बालमानसशास्त्र इत्यादी

बालविकासाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतो. "बालविकास गर्भधारणेपासून किशोरावस्थेपर्यंतच्या कालखंडाचे अध्ययन केले जाते." बालकाच्या जीवनाचा प्रारंभ, गर्भधारणेपासून होतो. गर्भधारणा ते किशोरावस्था याकाळात अनेक बदल घडून येतात ज्यांचा संबंध बालकांच्या वृद्धीशी व विकासाशी असतो.

गर्भधारणा ते किशोरावस्था याकाळात बालकांची वृद्धी व विकास होते. त्यामुळे या कालखंडाला बालविकासाचा अध्ययन काळ म्हटले जाते. या कालखंडात बालकात अनेक प्रकारची परिवर्तने घडून येतात.

## बालविकासाची व्याख्या :-

विविध शास्त्रज्ञांनी बालविकासाच्या अनेक व्याख्या तयार केलेल्या आहेत. त्यापैकी काही महत्वपूर्ण व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत

SEAL

# Project Copy



1] **सरोजिनी आव्हरशीअन** :-

यांच्या मते, "गर्भधारणेपासून किशोरावस्थेपर्यंत बालकाच्या वाढीचे व विकासाचे अध्ययन करणारे विशेष क्षेत्र म्हणजे बालविकास होय"

2] ~~स्त्र~~ **एलिझाबेथ हरलॉक** :-

यांच्या मते, "जन्मपूर्व अवस्थेपासून पौगंडावस्थेपर्यंत विविध अवस्थांमधील वाढ आणि विकासाच्या अभ्यासांबरोबर त्यातील समस्या शास्त्रशुद्ध पद्धतीने सोडविण्याचे शास्त्र म्हणजे बालविकास शास्त्र होय."

\# **बालविकासाचे महत्त्व** :-

बालविकासाचा अर्थ पाहिल्यानंतर, बालविकासाच्या अध्ययनाचे महत्त्व पुढील मुद्यांवरून स्पष्ट करता येईल

1) बालविकासाची सुरुवात गर्भधारणेपासून होते, तेव्हा त्या ~~दृष्टीने~~ दृष्टीने तेव्हापासून योग्य ती काळजी घेता येईल.

2] गर्भावस्थेच्या काळात मातेचा आहार, आरोग्य तपासणी, औषधे, लसीकरण इत्यादींचा वेळच्या वेळी आढावा घेऊन बालविकासाला पोषक वातावरण तयार करता येईल.

3] बालकाच्या जन्मानंतरच्या काळात, स्तनपान, बालकाचे लसीकरण, वरचे दूध, पूरक आहार याबाबत योग्य ते नियम तयार करता येईल. जेणेकरून बालकाच्या वाढीवर व विकासावर त्यांचा सुयोग्य परिणाम होईल.

# Project Copy

www.youvaworld.com

Date : Page : 3

Topic :

4) बाल्यावस्थेतील बालकांचे आजार - सर्दी, पडसे, ताप इत्यादी, तसेच अपघात यांची विशेष काळजी घेता येते. कारण बालकांच्या आजारपणाच्या व अपघातांचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर दीर्घकालीन परिणाम होत असतो. त्यातून बालकांची सुरक्षा करणे शक्य होते.

5) बालविकासात बालकांच्या विकासाची व वाढीची प्रक्रिया गर्भधारणेपासून ते किशोरावस्थेपर्यंतच्या काळात सतत सुरू असते तेव्हा या बाल्यावस्थेच्या काळात, बालकांचे खेळणे, शिस्त, संगोपनाच्या पद्धती या विषयीचेही मार्गदर्शन होते.

एकंदरच बालकांच्या वाढीला व विकासाला पोषक वातावरण निर्मिती करण्यास बालविकास शास्त्र अतिशय उपयुक्त ठरते. त्यामुळे आई-वडील, नातेवाईक व अन्य संबंधित व्यक्तींनी बालविकासाचा अभ्यास करणे अतिशय उपयुक्त ठरते. त्या अध्ययनाच्या आधारे ते आपल्या बालकाच्या जीवनास योग्य दिशा देऊ शकतात.

## # बालविकासाची व्याप्ती :-

बालविकासाची व्याप्ती खूप व्यापक आहे. कारण बालविकासात गर्भावस्थेपासून ते किशोरावस्थेपर्यंतच्या सर्व विकासांचा समावेश होतो. गर्भावस्थेपासून ते किशोरावस्थेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बालकांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक विकास कसा होतो, त्यावर कोणकोणते घटक परिणाम करतात या सर्व विकासांचे परस्परसंबंध इत्यादींचा समावेश होतो.

त्या व्यतिरिक्त बालविकासात बालकांच्या समस्या त्यांचे परिणाम, बालसंगोपन, वर्तन समस्या इत्यादी घटकांचे सविस्तर अध्ययन केले जाते.

बालविकासाची व्याप्ती समजून होण्यासाठी पुढील तक्त्याचा आधार होता येईल.

SEAL

**Project Copy**



SEAL

**Project Copy**



## * बालविकासाचे अध्ययन :-

### i) विकासाच्या अवस्थांचे अध्ययन :-

विकासाच्या अवस्थांचे अध्ययन गर्भधारणेपासून सुरू होऊन किशोरावस्थेपर्यंत केले जाते. बालविकासाचे दोन खंडात वर्गीकरण करता येते.

अ) जन्मपूर्व विकास
ब) जन्मोत्तर विकास

### अ) जन्मपूर्व विकास :-

यात गर्भधारणेपासून तर जन्मापर्यंतचा काळ समाविष्ट केला जातो. हा कालावधी 9 महिने 9 दिवस इतका धरला जातो. जन्मपूर्व अवस्था तीन भागात विभागली जाते.

**i) बीजावस्था :-** गर्भधारणेपासून ते पहिले 2 आठवडे पर्यंतचा काळ

**ii) भ्रूणावस्था :-** दोन आठवडे ते आठ आठवडेपर्यंतचा काळ.

**iii) गर्भावस्था :-** 8 आठवडे ते बालकाचा जन्म होईपर्यंतचा काळ

### ब) जन्मोत्तर विकास :-

बालकाचा जन्म झाल्यानंतरचा काळ यात मोजला जातो. या काळाचे देखील विविध विभागात वर्गीकरण केले जाते.

**Project Copy**



SEAL

## Project Copy



i) नवजातअवस्था / अर्भकावस्था :-

बालकाचा जन्म झाल्यापासून ते पहिले 15 दिवसांपर्यंतचा काळ नवजातअवस्थेचा समजला जातो या अवस्थेत शिशूच्या विकासाची गती मंद असते कारण नवजात बालकाला बाहेरील वातावरणाशी समायोजन करावे लागते. जसे - अन्न घेणे, श्वसन क्रिया, मलमूत्र विसर्जन तापमानाशी समायोजन इत्यादी

ii) शैशवावस्था :-

जन्मानंतरच्या 15 दिवसांपासून (नवजातअवस्था संपल्यानंतरचा काळ) तर पहिले दोन वर्षापर्यंतचा कालखंड म्हणजे शैशवावस्था होय. या काळातील बालकाला शिशू म्हणतात. शिशू आपल्या गरजा भागविण्यासाठी मातेवर अवलंबून असतो. हळूहळू तो परावलंबनातून स्वावलंबनाकडे जाऊ लागतो. स्वतःच्या हाताने खाण्याचा प्रयत्न करणे, चालणे, बोलणे शिकू लागतो.

iii) बाल्यावस्था :-

बाल्यावस्थेचे अभ्यासाच्या दृष्टीने दोन भागात वर्गीकरण केले जाते. 1) पूर्व बाल्यावस्था 2) उत्तर बाल्यावस्था

1) पूर्व बाल्यावस्था :-

2 वर्ष ते 6 वर्षे पर्यंतचा काळ म्हणजे पूर्व बाल्यावस्था समजली जाते. याला शाळापूर्व अवस्था असेही म्हणतात. ~~म्हणून~~ मूल प्रत्यक्ष औपचारिक शिक्षणात प्रवेश करण्यापूर्वीचा हा काळ होय. या वयातील मुले नर्सरीमध्ये जातात.

SEAL

**Project Copy**



**Project Copy**

Date : Topic : Page 6

2) उत्तर बाल्यावस्था :-

6 वर्षे ते 12 वर्षेपर्यंतचा काळ उत्तर बाल्यावस्था म्हणून ओळखला जाते. या अवस्थेत बालकाच्या सामाजिक विकासाला सुरुवात होते. शाळा, शिक्षण, मित्र यांच्याशी त्याची ओळख होते, आपसात कसे वागावे, बोलावे याचे ज्ञान त्याला मिळू लागते.

iv) किशोरावस्था :-

12 ते 21 वर्षाचा काळ किशोरावस्थेचा म्हटला जातो. या काळात तीन भटात विभाजन केले जाते.

1) पूर्व किशोरावस्था
2) आरंभिक किशोरावस्था
3) उत्तर किशोरावस्था

पूर्व किशोरावस्था - 13 ते 15 वर्षे
आरंभिक किशोरावस्था - 15 ते 17 वर्षे
उत्तर किशोरावस्था - 17 ते 21 वर्षे

बालकाच्या जीवनात किशोरावस्थेस अतिशय महत्त्व असते. जरी वर आपण वयानुसार वर्गीकरण केले असेले तरी निश्चित वयात विभागणे शक्य नसते, कारण मुलामुलींमध्ये लैंगिक परिपक्वता येण्याचा काळ भिन्न-भिन्न असतो. त्यानुसार त्यांच्यात विविध प्रकारचे शारीरिक, मानसिक इत्यादी बदल होत असतात.

2) बालविकासाच्या विविध अंगांचे / क्षेत्राचे अध्ययन :- बालविकासात बालकाच्या विविध अंगाचे अध्ययन केले जाते. जसे - शारीरिक विकास, मानसिक विकास, सामाजिक विकास, बौद्धिक विकास, भाषा विकास,

**Project Copy**



नैतिक विकास, व्यक्तिमत्व विकास इत्यादी. या सर्व प्रकारच्या विकासाचे अध्ययन बालविकासाच्या अभ्यास विषय होय.

### ३) बालविकासाला प्रभावित करणारे घटक :-

बालविकासाच्या अध्ययनात बालकांच्या विविध विकासाला प्रभावित करणाऱ्या घटकांचाही सविस्तर अभ्यास केला जातो. जसे - आनुवंशिकता, वातावरण, संधी, प्रशिक्षण, संस्कृती, आहार, आर्थिक परिस्थिती, पोषण, अंत:स्त्रावी ग्रंथींचा परिणाम इत्यादि.

### ४) मानसिक स्वास्थ्य विज्ञानाच्या मूलभूत सिद्धांतांचे अध्ययन :-

व्यक्तीचे मन व शरीर यांचा जवळचा संबंध असतो. शारीरिक आरोग्यावर मानसिक आरोग्य अवलंबून असते तेव्हा मानसिक आरोग्याचे रक्षण कसे करावे याचे मार्गदर्शन मिळते. मानसिक प्रक्रियांचे जसे - स्मरण, कल्पनाशक्ती इत्यादिंचेही अध्ययन होते.

### ५) असाधारण व अपसामान्य बालकांचे अध्ययन :-

सामान्य बालके व असाधारण बालके यात फरक असतो. तसेच सामान्य बालके व अपसामान्य (Abnormal) बालके यातही बरीच तफावत असते.

अपसामान्य बालकांमध्ये भाषा दोष, मानसिक न्यूनता, कु-समयोजन इत्यादी समस्या आढळतात. त्यांना कसे हाताळावे, याचे अध्ययनही बालविकास शास्त्रात केले जाते.

काही बालके असाधारण (Exceptional) असतात. म्हणजे सामान्य बालकांच्या तुलनेत त्यांची हुशारी, बुद्धिमत्ता, सृजनशीलता अधिक असते अशा बालकांच्या विकासाला आणखी प्रोत्साहन कसे द्यावे, कशा संधी उपलब्ध करून द्याव्यात याचेही अध्ययन बालविकास शास्त्रात होते

**Project Copy**



## * बालविकासाची वाढ व विकास

### 1] वाढ व विकासाची व्याख्या :-

मानवी आयुष्यात वाढ व विकास हे दोन घटक अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. बरेचदा वाढ व विकास हे दोन शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. परंतु त्यांच्यात मूलभूत फरक आहे. विविध शास्त्रज्ञांनी व्याख्यांद्वारे या दोन संज्ञांमधील फरक स्पष्ट केला आहे.

### * वाढ :-

एलिझाबेथ हरलॉक यांच्या मते, "वाढ हा परिमाणात्मक बदल असून तो बदल शरीराच्या आकारात व रचनेत होतो." वाढ ही संख्यात्मक असते, गणनात्मक असते. वाढ या शब्दाने मुख्यत्वे शारीरिक वाढीचा बोध होतो. वाढ म्हणजे शारीरिक वाढच गृहीत धरली जाते. वाढ या संज्ञेत उंची व वजनातील वाढ अभिप्रेत असते. आपण वजन व उंची दोन्हीचेही मापन करू शकतो. वाढीतील बदल शरीराच्या आकारात व रचनेत आढळतात. आपण वाढीचे निरीक्षण व मोजमापही करू शकतो. बालकाचे निरीक्षण केल्यास बालकाची उंची व वजन वाढले की नाही ते सहजपणे सांगता येते.

बालकाच्या वजनातील वाढ मोजण्यासाठी वजन यंत्राचा उपयोग करता येतो. तर उंचीतील वाढ मोजण्यासाठी टेपचा वापर करता येतो.

शारीरिक वाढ ही पेशी, अंतर्गत व बाह्य अवयवांमध्ये होत असते. शरीरातील पेशींची व आंतरिक अवयवांची वाढ झाली की, आपोआपच शरीराच्या बाह्य अवयवांची वाढ झालेली दिसते. शरीररचना, शारीरिक लक्षणे व आकारमानातील परिवर्तनांचा समावेश वाढीमध्ये होतो.

वाढीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे वाढ ही एका विशिष्ट काळानंतर थांबते. उदा. - बालकांची उंची एका विशिष्ट वयानंतर स्थिर

SEAL

**Project Copy**



होते, त्यानंतर वय जरी वाढत असले तरी उंची सतत वाढत नाही. अवयवांमध्ये परिपक्वता आल्यानंतर त्यांची वाढ थांबते.

गेसेल च्या मते, वाढीचा वेग हा जन्मजात असतो. ती निसर्गाची देणगी आहे. तिच्या सीमा ओलांडता येत नाही. आपण फक्त वाढीला दिशा देऊ शकतो. वाढीचा व विकासाचा संबंध नसतो.

शारीरिक वाढ झाली की विकास होतोच असे नाही. उदा – मंदबुद्धी बालके या बालकांच्या वजनात व उंचीत जरी वाढ झालेली दिसत असली तरी मानसिक विकास खुंटलेला असतो.

थाबुलट खुज्या व्यक्ती, ज्यांची उंची वाढत नसली तरी, त्यांचा अन्य विकास झालेला असतो.

## * विकास :-

विकासाची सुरूवात गर्भधारणेपासून होते आणि विकास सतत होत असतो तो मृत्यूपर्यंत सुरूच राहतो. विकासाची गती विविध अवस्थांमध्ये एकसारखीच राहत नसून कधी मंद तर कधी तीव्र असते. विकास कसा होतो हे जाणून घेण्यासाठी विकासाची तत्वे जाणून घेणे आवश्यक ठरते. कारण विकास त्या तत्वांनुसारच घडून येत असतो.

ज्याप्रमाणे व्यक्तीतील संख्यात्मक व परिमाणात्मक बदलांना 'वाढ' म्हटले, तसे व्यक्तीतील 'गुणात्मक' बदलांना विकास म्हणतात. ज्याप्रमाणे वाढ डोळ्यांनी / निरीक्षणाने सहजपणे दिसते तसा विकास पटकन लक्षात येत नाही. कारण विकासाचे मोजमाप करता येत नाही. उदा.- बालकाची उंची व वजन किती वाढले हे पटकन मोजता येते परंतु बालकांचा मानसिक, भावनिक, सामाजिक विकास किती झाला हे सांगता येत नाही. विकास किती झाला हे बालकाच्या वर्तनातील बदलांवरून ठरविता येते. विकास म्हणजे 'प्रगती' होय.

SBAL

**Project Copy**

www.youvaworld.com

Date : Page : 10

Topic :

* व्याख्या :-

1) प्रा. अमिता वर्मा

यांच्या मते, "मुलांच्या विकास झाल्यावर त्यांच्या कार्यात रेखीवपणा व सहजता येते. एखादे कार्य करण्यासाठी विशिष्ट अवयवांची परिपक्वता साधणे खूप महत्त्वाचे असते आणि खऱ्या अर्थाने त्यालाच विकास म्हणतात."

2) शरयू बाल

यांच्या मते, "परिपक्वतेच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल म्हणजेच विकास होय."

3) अँडरसन

यांच्या मते, "विकास म्हणजे बऱ्याच संरचना व कार्याच्या एकत्रीकरणाने होणारी एक गुंतागुंतीची प्रक्रिया होय."

एलिझाबेथ हरलॉक यांच्या व्याख्येवरून विकासाची काही वैशिष्ट्ये सांगता येतात.

1) विकास हा परिवर्तन सूचक आहे.
2) विकासाचा क्रम ठरलेला असतो, त्या निश्चित क्रमानेच विकास होतो.
3) विकासाची निश्चित दिशा व लक्ष्य असते.

यावरून असे म्हणता येते की, विकास ही व्यापक संकल्पना आहे, अमूर्त आहे. विकासाने शारीरिक क्षमतांच्या वाढीचा निर्देश केला जातो. विकासाचे तात्पर्य शरीराच्या सर्व अंगांच्या सर्व दिशेकडे होणारे परिवर्तन आहे.

SEAL

HOD